# राशिभविष्य - मे, २०१९.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

================================================================

**(१) मेष-** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. शिवाय काही ना काही अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणाऱ्यानी मनस्थिती स्वस्थ व शांत राखण्याचा मनापासून प्रयत्न करावा. काही मंडळींना गलितगात्र थकवा येणे संभवते. काही मंडळींना नेत्रविकार त्रस्त करील. महिन्याच्या प्रथम सप्ताहात काही मंडळींना उष्णताविकार त्रस्त करतील. घसा, मान, दाढा अशापैकी कसला तरी आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. आर्थिक समस्या त्रस्त करतील. ती चिंता अस्वस्थ करील. "देणे द्यावेच लागेल पण येणे मात्र कधी येईल, ते सांगता येणार नाही. काही मंडळींना आर्थिक नुकसानही सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहात मंगळ ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर तो त्या स्थानी असलेल्या राहूसह असणार आहे. त्यामुळे मनस्थितीत सुधारणा होईल. महत्त्वाकांक्षा वाढेल. आत्मविश्वास वाढेल. धैर्य, हिंमत वाढेल व तुमची कर्तबगारी दिसून येणाऱ्या घटना घडतील. प्रवासाचे योगही संभवतात. पण या राहूमुळे काही कारणाने बंधुसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टमस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना ; वारसाहक्काने असा धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या केतूमुळे " वरून कीर्तन, आतून तमाशा" अशा प्रकारचे ढोंगी, धूर्त आचरण होण्याची शक्यता आहे. जपा. या केतूमुळे काहीही कारणाने संतति सुखात बाधा येणे संभवते. केतूबरोबर शनि ग्रह असला तरी तो अनुकुल असाच असेल. लोखंड, कोळसा अशापैकी व्यापार असणारांना, तसेच यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना तो काही प्रमाणात अनुकुलच होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतीलच; पण शिवाय कुमार्गी मित्रांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे गहिरे नैराश्य येण्याची शक्यताही दिसते. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल . व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्राचे पठण करा. तसेच २१ वेळा " ओम गं गणपतये नमः: " मंत्राचा जप करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना घरीदारी सर्व ठिकाणी विरोधी परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. स्वभाव हट्टी, मानापमान फार असल्यामुळे अकारण शरीरपीडा व श्रम होणे संभवते. त्यामुळे शारीरिक ऊष्णता भडकून उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना नेत्रपीडा, तर काहीना घसा, मान, दाढा दुखणे अशापैकी आजार होणे संभवते. अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या निर्माण झाल्या तर त्या कशा पूर्ण करावयाच्या याची चिंता अस्वस्थ करील. कौटुंबिक जीवनातही विविध कारणांनी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. काही मंडळींना अतिशय थकल्यासारखे वाटेल. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी मनःक्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. काही मंडळींच्या मैत्रीत बाधा येणे संभवते. चंचल अस्वस्थ मनस्थितीमुळे काहींना कुसंगतीची बाधा होण्याची शक्यता आहे. जपा. व्ययस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे काही मंडळींना जिवावरच्या प्रसांगाशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या अष्टम

स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडणे, काही मंडळींना एखाद्या गंभीर आजाराची बाधा होणे संभवते. याच स्थानी असलेल्या केतुमुळे काही मंडळींना त्वचा विकार, रक्तविकार अशापैकी आजार होणे संभवते. जपा. शिवाय वैवाहिक जीवनातील . सुखात बाधा येणेही शक्य दिसते. जपा. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकूलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल व मनशांती लाभेल. या राशीच्या दशम स्थानी असलेला नेपच्यून मनोवैज्ञानिक व्यवसाय असणारांना व द्रव पदार्थांचा व्यापार असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीचे विद्यार्थी सर्वांगीण आरोग्य उत्तम राखू शकले तरच त्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शक्ती प्राप्त होईल. दररीज नियमितपणे “ओम नम: शिवाय “ मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “ हनुमानचालीसा” स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. नोकरदार मंडळींपैकी काहींना बढती, काहींना एखादे अधिकारपद, मानाचे स्थान तर क्वचित कोणास उच्च पदही मिळण्याची शक्यता आहे. मात्र हर्षल ग्रहामुळे मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. तसेच स्वतंत्र व्यवसाय असणारांना महिन्याच्या पूर्वार्धात व्यवसायात अडचणी अडथळे येण्याची शक्यता आहे. पण महिन्याचा उत्तरार्ध मात्र त्यांना अनुकुल व लाभदायक होईल. नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध मनाविरुद्ध घटना घडवणारा असाच असल्याचा अनुभव येईल. त्यामुळे काही मंडळींना गहिरे नैराश्य येणे संभवते. तर काहींना अस्वस्थता जाणवेल. जपा. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक चिंता, मानहानी, भांडणे, यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. तसेच हट्टी स्वभाव व मानापमानाच्या अवास्तव कल्पना असलेल्यांना अकारण श्रम, दगदग केल्यामुळे थकल्यासारखे वाटेल. काही मंडळींना उष्णताविकाराचा तर काहींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला गुरु ग्रह बौद्धिक व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे विवाहयोग उशीरा येणे संभवते. पण याच स्थानी असलेल्या केतू ग्रहामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. कोर्ट प्रकरणे असतील त्यांनी शक्य असल्यास ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. नपेक्षा अपयश येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना आध्यात्मिक उपासनेत सहज प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडण्याची शक्यता आहे. तसेच काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीचे विद्यार्थी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखू शकले तरच त्यांना शैक्षणिक प्रगती करता येईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाही काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात स्वतंत्र व्यवसाय करत असणारांना अडचणी, अडथळे, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या लाभस्थानी

असलेल्या मंगळ ग्रहामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण याच मंगळ ग्रहामुळे काही मंडळींना एखादी मौल्यवान गोष्ट मिळणेही संभवते. महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर हा मंगळ ग्रह या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर पूर्णपणे अशुभ होईल व त्यामुळे मनस्ताप, आर्थिक चिंता, अनारोग्य अशापैकी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. पण या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळू शकेल. हितशत्रूंपासून हा राहू रक्षण करील. पण वैवाहिक जीवनातील सुखात मात्र काहीही कारणाने बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांना या महिन्याचा संपूर्ण काळ शैक्षणिक प्रगतीस अनुकुल होईल. मात्र सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. या राशीच्या षष्ठ या आरोग्यस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काहीही कारणाने शत्रुत्व निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच गैरसमजाने वाद भांडणे होणेही संभवते. पण हा शनि लोखंड कोळसा यांचा व्यापार असणारांना तसेच यांत्रिकतांत्रिक व्यावसायिकांना अनुकुल व लाभदायक होईल. या स्थानी असलेला केतूही उद्योगव्यवसायाला अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रह अनुकुल असेल व त्यामुळे सतत मनोनुकुल घटना घडतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात या शुक्रामुळे स्वतंत्र व्यवसाय करत असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. जलभय असल्याने जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहू नका. तसेच विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. पण नात्यातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. तसेच या राशीच्या मंडळींना मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची अथवा आचरणविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांनी ,मनापासून चिकाटीने अभ्यास केला तरच प्रगती करू शकतील. पण त्यासाठी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे महिन्याच्या पूर्वार्धात वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी स्वतः:च्या उच्च राशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा जास्त अर्थलाभ होणे संभवते. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर गुरुकृपा , थोरकृपा , ऐषाराम, सुखसमाधान लाभेल. तसेच या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना आपल्या संशोधन कार्यात अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात मनस्ताप, मानसिक ताण, अनारोग्य यांचा त्रास सहन करावा लागेल या राशीच्या दशमस्थानी असलेला मंगळ ग्रह यांत्रिकतांत्रिक नोकरीव्यवसाय असणारांना व औषधविक्रेत्यांना केवळ महिन्याच्या प्रथम सप्ताहच अनुकुल व लाभदायक होईल. बुध ग्रहामुळे ,मानसिक, कौटुंबिक सुख लाभेल. महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर मंगळ या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अर्थलाभ होण्यास खूप कष्ट, परिश्रम करावे लागतील. पण काहींना एखादी मौल्यवान गोष्ट मिळणेही संभवते. पण याच स्थानी असलेला राहू संततिसुखात बाधा आणू शकेल. जपा. तसेच या

राशीच्या अधिकारी मंडळींनी आपल्या अधिकाराचा गैर उपयोग करू नये. अंगाशी येईल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकूल होईल व मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात उगीचच आपल्याला एखादा आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना एखादी काल्पनिक चिंता त्रस्त करील. काहींना आपली फसवणूक झाल्याची हळहळ त्रस्त करील जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. हाती घेतलेल्या कामात अडथळे, अपयश येणे संभवते. इच्छाआकांक्षा . अपूर्ण राहतील. त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता आहे. कठीण श्रम, मानसिक ताण यांमुळे अनारोग्य होणे संभवते. क्वचित कोणास पदावनती सहन करावी लागेल. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीतही बुध-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही भाग्यवंतांना महिन्याच्या पूर्वार्धात अचानक धनलाभ होणेही संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघात भय आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगानेच चालवा. त्यावेळी मोबाईलवर वार्तालाप करू नका. महिन्याच्या उत्तरार्धात बुध ग्रह प्रतिकुल होईल पण शुक्र ग्रहामुळे मनोनुकुल घटना घडतील. महिन्याच्या प्रथम सप्ताहात शक्यतो प्रवास करू नका. मनस्ताप , मानहानी होण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना नियोजित कामात यश मिळेल, तर काहींचा सन्मान होणे संभवते. मंगळ ग्रह या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच औषधविक्रेत्यांना प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या विवाहेच्छूना विवाह योग्य असून प्रेमिकांचे प्रेमविवाह होणेही शक्य आहे. या राशीच्या विवाहित मंडळींना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल;. जीवनसाथी कलाकार असल्यास दुधात साखरच ! या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या लेखक मंडळींचे लिखाण ग्रंथरूपात प्रसिद्ध होणे संभवते. पण या गुरूमुळे भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि -केतू या पापग्रहांमुळे विविध कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीगुरुदेव दत्तात्रेय यांची उपासना मनशक्ती व मनशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर नियमितपणे एकवीस वेळा “ओम गं गणपतये नमः: “ मंत्राचा जप करा. तसेच “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(७) तुला -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मन खंबीर व आत्मविश्वासपूर्ण बनविणे सहज शक्य होईल. त्यासाठी काळ अनुकुल आहे. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात काही काळ रवि -मंगळ हे दोन्ही उष्ण प्रकृतीचे ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी असल्यामुळे रोग प्रतिकार शक्ती कमी होणे, शारीरिक-मानसिक अनारोग्यकारक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करील. काही मंडळींना अन्य प्रकारचे उष्णताविकार करतील.

इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील, अपेक्षाभंग होईल. जपा. शिवाय मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. सतत सावधानतेने आचरण करा. छोटे मोठे अपघात होणे संभवते. त्यात हाडमोड होणेही शक्य आहे. जपा. अशा परिस्थितीत बुध ग्रह अनुकुल असल्याने काही मनोनुकुल घटना घडतील. व दिलासा मिळेल. या महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी असल्याने योग्यता, उच्च गुण असूनही कर्तृत्व सिद्ध करण्याची संधीच मिळणार नाही. प्रगतीत अडथळे येतील.
वासनात्मक प्रेमभावना विनाशकारक ठरेल. जपा. त्यामुळे काही मंडळी व्यसनाधीन होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी आल्यावर अनुकुल होणार असला तरी त्याच स्थानी असलेल्या बुध-हर्षलमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापारव्यवसाय आहे अशांनी संशय किंवा गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या महिन्यात शक्यतो प्रवास करू नका. मनस्ताप, मानहानी होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना अपेक्षित असे मनासारखे कार्यक्षेत्र किंवा उत्तम प्रकारची नोकरी मिळण्याची शक्यता दिसते. धन-कुटुंब स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व आर्थिक चिंताही होणार नाही. श्रद्धा असेल शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मनशांती देईल. दररोज नियमितपणे "ओम नम: शिवाय" मंत्राचा एक माळ जप करा. तसेच "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. सर्व प्रकारच्या कलाक्षेत्रातील मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. म्हणून जे काय साध्य करावयाचे ते साध्य करण्यासाठी महिन्याच्या पूर्वार्धातच आटोकाट प्रयत्न करा. कारण महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर प्रगतीची व कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळण्याची शक्यता दिसत नाही. गुरु-हर्षल-बुध हे तिन्ही ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होतील. पण अति विचार करू नका. नपेक्षा काही मंडळींना डोकेदुखीचा तर काहींना मेंदुविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. धनस्थानी असलेले शनि व केतू हे दोन्ही ग्रह आर्थिक समस्या व आर्थिक चिंता निर्माण करणारे असून कौटुंबिक सुखात बाधा आणणारेच आहेत. त्यामुळे सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच आचरण करा. नेपच्यूनसुद्धा गृहसौख्यात बाधा आणू शकेल. मंगळ ग्रह अनारोग्यकारक असून वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणणारा असल्याचाच अनुभव येईल. तसेच सतत सावधानतेने आचरण करा. कारण या मंगळामुळे अपघातभय आहे. हाडमोड होणे संभवते. काही मंडळींना उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करील. जपा. पाण्यापासून धोका असल्याने जलप्रवास करू नका. तसेच विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. राहू-मंगळ एकत्र अष्टम स्थानी असल्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते.. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच आचरण करणें सुखावह होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर एकवीस वेळा "ओम गं गणपतये नमः" मंत्राचा जप

करा. “श्रीगणपती अथर्वशीर्षा”चे पठण करा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी “हनुमानचालीसा” स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ शारीरिक अनारोग्यकारक व मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. त्यात सध्या भावनाशील मनस्थिती झाली असल्यास काही मंडळींना गहिरे नैराश्य येण्याचीही दाट शक्यता आहे. शनि - मंगळ - रवि - राहू हे ग्रह अनारोग्यकारक व मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह नोकरदार मंडळींना नोकरीत अनुकुल, पूरक व लाभदायक होईल. शनिमुळे वातविकाराचे आजार तर मंगळामुळे उष्णताविकाराचे आजार बळावतील. ताप येणे, इजा होणे, फोड येणे, रक्तविकार बळावणे, अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात हृदयविकार असलेल्यांनी मनस्थिती अत्यंत स्थिर व शांत राखण्याचा प्रयत्न करावा. काही मंडळींच्या कुटुंबात प्रिय व्यक्तींपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यामुळे होणाऱ्या दुराव्यामुळे मनस्थिती अस्वस्थ होईल. केतुमुळे वाहनधोका संभवतो. म्हणून रस्त्याने सावधानतेने चाला. वाहन नियंत्रित वेगाने व सावधानतेने चालवा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या नेपच्यू नमुळे गूढविद्या , अध्यात्म यांची मनापासून आवड व ओढ असेल त्यांना उपासनेद्वारे मन:शक्ती लाभेल व गूढ संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल.तसेच काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. शुक्र ग्रहामुळे ज्यांची शेतीवाडी आहे अशांना त्यापासून अपेक्षित अर्थलाभ होईल व ऐषाराम मिळेल. हा शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर कलाक्षेत्रातील मंडळींना आपापल्या कलाक्षेत्रात अपेक्षित प्रगती करणे सहज शक्य होईल. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल तर उत्तरार्धात अनुकुल व नियोजित बौद्धिक कार्यात यश देणारा असाच असेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक असल्याचाच अनुभव येईल. मंगळ ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर त्याच्यामुळे व त्याच स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असलेल्यांनी संशय गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीचे विद्यार्थी आपले सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखू शकले तरच त्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. सामाजिक कार्याची आवड असणारांना काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर ”शिवोपासना” व “श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना” मनशक्ती व मनशांती देईल. दररोज एक माळ “ओम नम:शिवाय” मंत्राचा जप करा. तसेच दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ सर्व दृष्टीनी प्रतिकुलच आहे, असे म्हणावे लागते. नोकरी-व्यवसायात व कौटुंबिक जीवनात सतत मनाविरुद्ध व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची दाट शक्युता आहे. विशेष करून स्वतः:चे व कुटुंबियांचे अनारोग्य, आर्थिक समस्या, दैनंदिन जीवनात सतत येणाऱ्या अडचणी, अडथळे, विरोध या सर्व गोष्टीना सामोरे जावे लागणार आहे. या राशीच्या व्ययस्थानी शनि सह असणाऱ्या केतुमुळे स्वभाव चंचल लहरी होणे संभवते .

शनि ग्रहामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. या काळात सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक, काळजीपूर्वक व सरळ मार्गानेच करा. गडबड, घोटाळे होणार नाहीत याची काळजी घ्या.

नपेक्षा होणारी मानहानी सहन करावी लागेल. त्याचा परिणाम शारीरिक अनारोग्य होण्यातही होऊ शकेल. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभू देणार नाही. पण मन स्थिर, संयमित राखू शकलात व विकृत विचारांना थारा दिला नाहीत, तसेच सहनशील बनून जिभेला लगाम घालून नम्रतेचे आचरण केलेत तर खूपच सुखाचे होईल व होणार नुकसान टळू शकेल. " महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती " हे तुकोबांचे वचन पक्के ध्यानात ठेवून आचरण करा. तरच बुध -गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने ज्या काही मनोनुकूल घटना घडतील त्यांचा आनंद उपभोगू शकाल. रवि - बुध ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत वरिष्ठांकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. त्याचा त्यांच्या शारीरिक आरोग्यावरही परिणाम होणे संभवते. जपा. महिन्याच्या प्रथम सप्ताहात मंगळ ग्रहामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करील. नंतर तो अनारोग्यकारक होईल. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास होईल, तर काहींना आर्थिक नुकसानीचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील व ज्यांचा अन्य जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे त्यांना अशा संबंधामुळे काही तरी लाभ होईल. पण या राहूमुळे काही मंडळींना पोटाच्या अनारोग्याचा त्रास होणे संभवते. शिवाय विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. अशा प्रतिकुल काळातही जन्मकुंडलीत योग असेल तर शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा असे काही मिळू शकेल. लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळेही काही इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नवे स्नेहसंबंध जुळतील. विवाहेच्छूंचे विवाह जमतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे एक माळ "ओम नम: शिवाय " मंत्राचा जप करा. तसेच शिवलीलामृत " स्तोत्राचे व " श्रीहनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अत्यंत कोमल झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति शीघर होत असल्या पाहिजेत. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहिरे नैराश्य येत असले पाहिजे. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. तुमच्या कार्यकुशलतेने वरिष्ठ प्रभावित होतील. त्यामुळे काही मंडळींना बढती, काहींना मानाचे स्थान तर काहीना एखादे उच्च पद मिळणेही संभवते. शिवाय रवि ग्रहासह हर्षलही असल्याने व दशम या व्यवसाय स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेल्याना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही भाग्यवंत मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. काही मंडळीना नवे आवडीचे कार्यक्षेत्र मिळणेही संभवते. पण बुधामुळे हितशत्रूंचा त्रास होण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -मंगळ हे दोन्ही उष्ण प्रकृतीचे ग्रह गृहसौख्य स्थानी असल्यामुळे कुटुंबिक जीवनात वाद, गैरसमज, भांडणतंटे होणे संभवते. तसेच एखादी असमाधानकारक घटनाही घडण्याची शक्यता दिसते. जपा. पण बुध-शुक्र ग्रह अनुकुल असल्याने परिस्थिती आटोक्यात राहील. मित्र सुख मिळेल. पण काही मंडळींना अनारोग्याचा त्रास, आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. या महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर मंगळ या राशीच्या पंचम स्थानी राहूसह असल्याने संततिसमस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. मुलांपैकी कोणाचे आजारपण तर कोणाची आचरणविषयक समस्या मनस्ताप देईल. जपा. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू दलाली,

कमिशनवर व्यवसाय करत असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेला शनि ग्रह अर्थलाभ देऊ शकेल. पण संततीस त्रासदायक होईल. केतुमुळे प्रवासयोग येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे”चे तसेच हनुमानचलीसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तुमच्या कार्यकुशलतेवर वरिष्ठ खुश होतील. काही मंडळींना बढती, काहींना एखादे मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण बुधामुळे हितशत्रूंपासून धोका संभवतो. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात वाढता खर्च, वित्त हानी, आर्थिक जबाबदाऱ्या, घरीदारी भांडणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण बुध -शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे दिलासा मिळेल. धनस्थानी हर्षल अति अस्थिर, चंचल असल्यामुळे अविचाराने खर्च होणे संभवते. जपा. तसेच या हर्षलमुळे समोरच्याशी अविचाराने फटकळपणे बोलून इच्छा नसतानाही त्याचा अपमान होणे संभवते. या काळात जिभेला लगाम घाला. तसेच हातून विक्षिप्त आचरण होणे संभवते. जपा. काही मंडळींना शारीरिक उष्णता भडकून डोळ्याच्या अनारोग्यास सामोरे जावे लागेल. महिन्याच्या पहिली सप्ताहात मंगळ ग्रह अनुकुल होईल पण महिन्याच्या उत्तरार्धात तो राहूसह गृहसौख्य स्थानी असल्याने कौटुंबिक सुखात गैरसमज वाद,, भांडणे, असमाधानकारक घटना घडणे, अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची दाट शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्माची मनापासून आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. प्रवासाचे योग येतील. प्रगतीच्या चांगल्या संधी मिळतील. सद्गुणांची वाढ होईल. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या केतूमुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा व आहे ती नोकरी वा व्यवसायच मनापासून करावा. दशम स्थानी गुरु ग्रहाच्या धनु राशीत असलेला शनि ग्रह वकिली व्यवसाय असणारांना, लोखंडी सामान व कोळसा विक्रेत्यांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे थोडे काही मनाविरुद्ध घडले तर लगेच गहिरे नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====